नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/११/२०२५ (बुधवार )**

## दुचाकी चोरीचा गुन्हा उघड, दोन आरोपी अटक
## नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड:—** पोलीस स्टेशन नरखेड येथे दाखल अप क्र. ७१७/२०२५ कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं. या मोटर सायकल चोरीच्या गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा नरखेड पोलीसांनी तांत्रिक पुरावे आणि गुप्त बातमीदाराच्या मदतीने शोध घेवुन आरोपी नामे १) सुंदर रमेश कठाणे, वय २४ वर्ष, रा. वडेगाव उमरी ता. नरखेड २) अभय दयाराम कुमरे, वय २३ वर्ष, रा. परसोडी ता. काटोल यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण गुन्हयासंबधाने विचारपुस केली असता त्यांनी संगनमत करून नरखेड येथून एक काळ्या रंगाची स्प्लेंडर प्लस मो. सा. क्र. एम.एच. ४० बी. यु. ४४७३ चोरून नेल्याची माहीती दिल्याने आरोपींकडून नमुद गुन्हयातील चोरीस गेलेली एक काळ्या रंगाची स्प्लेंडर प्लस मो. सा. क्र. एम.एच. ४० बी. यु. ४४७३ किंमती ३०,०००/— रूपयांचा मूद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद दोन्ही आरोपीतांना नरखेड पोलीसांनी अटक केली आहे.



## काटोल पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील ५ गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांनी पोलीस स्टेशन काटोल हद्दीतील ५ आरोपीतांना हद्दपार केले.**

१. आरोपी नामे किरण रमेशराव गजभिये, वय ३० वर्ष, रा. पेठ बुधवार, काटोल, याचेवर अवैध दारूचे ८ गुन्हे नोंद असुन अश्लिल शिवीगाळ, दुखापत करणे असे अनेक गुन्हे दाखल आहे. २. आरोपी मिलिंद उर्फ पिंटू मधुकर देशमुख, वय ४५ वर्ष, रा. राऊतपुरा, काटोल याचेवर बलादग्रहण, आगळीक, सार्वजनिक संपत्ती नुकसान यासारखे गंभीर गुन्हे नोंद आहे. ३. सोनु उर्फ निलेश आशानंद सोमकुवर, वय ३८ वर्ष, रा. कोहळा, ता. काटोल याचेवर चोरी, फौजादारी पात्र बलप्रयोग यासारखे गंभीर गुन्हे नोंद आहे. ४. नारायण गणपत

इटनकर, वय ५१ वर्ष, रा. कलंभा, ता. काटोल याचेवर दुखापत आदेशाचे उल्लंघन करणे यासारखे गुन्हे नोंद आहे. आणि आरोपी क्रं ५ नितीन उर्फ निखील रमेशराव सावरकर, वय २७ वर्षे, रा पेठ बुधवार, ता.जि नागपुर याचेवर अवैध दारू, अवैध अंमली पदार्थ तसेच दुखापत यासारखे गुन्हे नोंद आहे. नमुद पाचही आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी हे गुन्हे करण्याच्या सवईचे असल्याने ते अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितात तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर ५ आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव काटोल पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून **वर नमुद पाचही आरोपी यांना २ महीन्यांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर जिल्हा हद्‌दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी .**



आरोपी किरण रमेशराव गजभिये



आरोपी मिलिंद उर्फ पिंटू मधुकर देशमुख



सोनु उर्फ निलेश आशानंद सोमकुवर



नारायण गणपत इटनकर



**नितीन उर्फ निखील रमेशराव सावरकर**

## एमआयडीसी बोरी पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील गुन्हेगार योगेश वामनराव सातपुते याला नागपुर जिल्हयातुन १ वर्षाकरीता केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, नागपुर (ग्रामीण) यांनी पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीतील योगेश वामनराव सातपुते, वय २८ वर्ष, रा. बुट्टीबोरी , वार्ड क्रं ४, ता. जि. नागपुर या आरोपीला हद्दपार केले.**

नमुद आरोपी याचेवर गंभीर दुखापत, साधी दुखापत, सरकारी नोकरांवर हल्ला, गैरकायदयाची मंडळी जमविणे, खुनाचा प्रयत्न असे गंभीर गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य

जनतेच्या मनात दहशत पसरवितात तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव एम.आय.डी.सी. पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, नागपुर ग्रामीण यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून **योगेश वामनराव सातपुते, वय २८ वर्ष, रा. बुट्टीबोरी ,वार्ड क्रं ४ ता. जि. नागपुर याला १ वर्षांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**



**आरोपी योगेश वामनराव सातपुते**

# कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील १ गुन्हेगार नागपुर जिल्हयातुन हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा ५६ अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील सलमान फिरोज शहा वय २४ वर्ष, रा. इंदीरानगर वार्ड क्रं १२, कळमेश्वर याला हद्दपार केले.**

नमुद आरोपी याचेवर दखलपात्र आणि अदखलपात्र गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी हा गुन्हे करण्याच्या सवयीचा असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितात तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव कळमेश्वर पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून **नमुद आरोपी सलमान फिरोज शहा वय २४ वर्ष, रा. इंदीरानगर वार्ड क्रं १२, कळमेश्वर याला २ महीन्यांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**



**सलमान फिरोज शहा**

## सावनेर पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील १ गुन्हेगार नागपुर जिल्हयातुन हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांनी पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील प्रदयुमन इश्वर लोही, वय २५ वर्ष, रा. बोरगाव धु. ता. कळमेश्वर जि. नागपुर या आरोपीला हद्दपार केले.**

नमुद आरोपी याचेवर महीला व बाल अत्यचार तसेच रेती चोरीचे गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचा असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितात तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा

भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव सावनेर पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून **नमुद आरोपी प्रदयुमन इश्वर लोही, वय २५ वर्ष, रा. बोरगाव धु. ता. कळमेश्वर जि. नागपुर याला २ महीन्यांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**



**आरोपी प्रदयुमन इश्वर लोही**

## अंमलीपदर्थाची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद,आरोपी अटक कोंढाळी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कोंढाळी :— दिनांक ११/११/२०२५ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, महीला अरोपी रा. बाजारगाव झोपडपट्टी ही तिच्या राहत्या घरी अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी बाजारगाव झोपडपट्टी येथे जावुन सापळा रचुन महीला अरोपी हीचे घराची झडती घेतली असता घरझडतीमध्ये **१३७ ग्रॅम वाजनाचा अंमली पदार्थ गांजा किंमती ३,०००/—रुपये , रोख रक्कम ५,८००/—रुपये आणि गांजा विक्री साठी वारण्यात येणारे प्लॅस्टीक पिशव्या किंमती १००/— रूपये असा एकुण ८,९०० /— रूपयांचा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर मुद्द्देमाल जप्त करण्यात आला.**

नमुद प्रकरणी महीला आरोपी हीचे विरूध्द पोलीस स्टेशन कोंढाळी येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **पोलीसांनी नमुद महीला आरोपी हीला अटक केली आहे.**

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान येथे दिनांक ०५/०२/२०२५ रोजी अप क्र ७०/२०२५ कलम १३७(२) भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी हीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखडे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, पोशि पन्नालाल बटाउवाले त्यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. नमुद अपहृत मुलगी ही दरम्यान काळात रायपुर, राज्य छत्तीसगढ तसेच नांदेड येथे असल्याचे तांत्रिक पुराव्यावरून निदर्शनास आले होते. परंतु नमुद मुलगी ही मिळुन येत नव्हती. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण चे तपास पथक सतत तांत्रिक पुराव्यांची पडताळणी

करत होते. दिनांक १२/११/२०२५ रोजी तांत्रिक पुराव्यावरून नमुद गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध घेवुन बोर्डा , ता. पारशिवणी, जि. नागपुर येथुन ताब्यात घेतले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कन्हान पोलीस करीत आहेत.

## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्या ५ आरोपीतांवर ५ गुन्हे नोंद काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १२/११/२०२५ रोजी काटोल पोलीसांना डोंगरगाव येथे अवैध्यरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्यांबाबत गोपनिय माहीती प्राप्त झाली. काटोल पोलीसांनी पथके तयार करून एकाच वेळी डोंगरगाव येथे ठिकठिकाणी धाड टाकुन कारवाई केली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्या आरोपी नामे १. अमरसिंग अमर्या राजपुत, २. रमण भागवत पवार, ३. रामु किरण राजपुत आणि दोन महीला आरोपी अशा ५ आरोपीचे ताब्यातुन एकुण ९८,०००/—रुपये किंमतीचा मोहाफुल सडवा, ४,००० /— किंमतीची मोहाफुल हातभट्टीची दारू, १० प्लास्टीक ड्रम किंमत १००००/— रुपये आणि ४ लोखंडी ड्रम किंमती ४,०००/— रूपये असा एकुण १,१६,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त करून नाशवंत मुद्देमाल मोक्यावर पंचनामा कार्यवाही करुन नाश करण्यात आला आहे. ०५ आरोपी यांचे विरुध्द पोस्टे काटोल येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.





# पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत गहुहिवरा रेल्वे पुलावरील वाहतूक दिनांक १२/११/२०२५ ते दिनांक ११/०२/२०२६ रोजी पर्यंत दुसऱ्या मार्गांनी वळविल्याबाबत

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत येत असलेल्या तारसा रोडवरील गहुहिवरा चौकात महारेल कडून सन २०२३ साली रेल्वे रूळावर पुलाचे बांधकाम करण्यात आले होते. सदर पुलावर ३५ ते ४० टन पर्यंत जड वाहतुक होवू शकते असे सांगण्यात आले होते. सदर जड वाहनाकरिता पर्यायी रोड असतांना देखील टोल चुकविण्याच्या उद्येशाने ५० ते ६० टन पर्यंतची अवजड वाहने वाहतुक होत आहे. त्यामुळे पुलावर दोन बाजुमध्ये मधोमध ५ ते ६ इंच पर्यंत अंतर पडले आहे. यापुढे अशाच प्रकारे जडवाहतुक होत राहली तर पुलाचे नुकसान होवून पुलाचे दोन्ही बाजुला असलेल्या लोकांच्या रहत्या वसत्यांवर पुल कोसळून जिवितहानी व मालमत्ता हानी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. याकरीता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशान्वये **१२/११/२०२५ ते दिनांक ११/०२/२०२६ रोजी पर्यंत** खालील प्रमाणे वाहतुक वळविण्यात आली आहे.

- कोळसा खदान गोंडेगाव, कामठी ओ.सी.एम. ते कांद्री ते तारसा चौक ते तारसा रोड कन्हान ते गहु हिवरा रेल्वे पुल कन्हान ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ बायपास रोड नागपूरकडे जाणारी वाहतुक ही **कोळसा खदान गोंडेगाव, कामठी ओ.सी.एम. ते जबलपूर नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ टेकाडी बायपास रोड ते बोरडा टोलनाका ते नागपूर कडे जाईल.**

- कामठी ते तारसा चौक कन्हान ते गह हिवरा रेल्वे पुल तारसा रोड ते बाय पास रोडकडे जाणारी वाहतुक ही **कामठी ते कांद्री ते टेकाडी ते नागपूर जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ बायपास रोडकडे जाईल**

- तारसा रोड ते गहुहिवरा रेल्वे पुल तारसा रोड कन्हान ते कामठीकडे जाणारी वाहतुक ही **तारसा रोड ते जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ बायपास रोड कडे जाईल**.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने